# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125


**दिन विशेष...**

१७३६ : जेम्स वॅट या स्कॉटिश शास्त्रज्ञाचा जन्म.
१८९२ : विनोदी लेखक चिं.वि.जोशी यांचा जन्म.
१९५१ : आदिवासी समाज सुधारक अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर यांचे निधन.
१९६८ : भारताच्या बाजूने कच्छचा निर्णय लागला.
१९९० : आचार्य रजनिश यांचे पुणे येथे निधन झाले.

सेन्सेक्स ८३,५७०.३५ +१८७.६४ (०.२३%)
डॉलर ₹ ९०.७४

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३१ | १५ |
| दिल्ली | २२ | ०९ |
| मुंबई | २९ | १८ |
| नागपूर | ३० | ११ |
| पुणे | ३१ | ११ |


epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७१ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

जीवन सुंदर आहे, प्रत्येक दिवसाचा आनंद घ्या. शुभ सकाळ!

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:१०

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४५,५३५/- २,९५,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# काँग्रेसने जनतेचा विश्वास गमावला

## मुंबईच्या राजकारणावर बोलताना पंतप्रधान मोदींनी विरोधी पक्षांवर साधला निशाणा

वृत्तसंस्थत्त । दिल्ली

**काँग्रेसचा जन्म मुंबईत झाला. मात्र, आज त्याच महानगरीत काँग्रेसची राजकीय घसरण झाली आहे. मुंबईत तो पक्ष चौथ्या किंवा पाचव्या स्थानावर फेकला गेला आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील प्रमुख विरोधी पक्षावर जोरदार निशाणा साधला.**



आसाममध्ये रविवारी मोदींची सभा झाली. त्यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांच्या निकालांचा संदर्भ दिला. नकारात्मक राजकारणाचा संदेश देत असल्याने काँग्रेसने देशातील जनतेचा विश्वास गमावला आहे. त्याउलट, भाजप देशातील मतदारांची प्रथम पसंत बनला आहे. सुशासन आणि विकासासाठी मतदार भाजपवर विश्वास

**पंतप्रधान मोदी म्हणाले की, आजच्या मतदारांना सुशासन, विकास आणि विकास आणि वारसा या दोन्हींवर लक्ष केंद्रित करायचे आहे, म्हणूनच ते भाजपला पसंती देतात. या निवडणुकांमधून आणखी एक संदेश मिळतो: देश काँग्रेस पक्षाच्या नकारात्मक राजकारणाला सातत्याने नाकारत आहे. मुंबई शहरात, जिथे काँग्रेसचा जन्म झाला, तो आता चौथ्या किंवा पाचव्या क्रमांकाचा पक्ष बनला आहे.**

ठेवत आहे. बिहारमध्ये आम्ही २० वर्षांपासून सत्तेत होतो. तसे असूनही त्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत जनतेने भाजपला विक्रमी मतं दिली.

केरळमध्येही आमचा महापौर बनला आहे. नुकतेच महाराष्ट्रातील महत्वाच्या शहरांमधील निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. जगातील मोठ्या महापालिकांपैकी एका असणाऱ्या मुंबईत भाजपला पहिल्यांदाच विक्रमी जनादेश प्राप्त झाला.

आमच्या पक्षाला महाराष्ट्राच्या बहुतांश शहरांतील जनतेने सेवेची संधी दिली, असे ते म्हणाले. आसाम राज्य लवकरच विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार आहे.

यावेळी त्या राज्याची सत्ता राखण्याचे मोठे आव्हान भाजपसमोर असल्याचे मानले जाते. त्या पार्श्वभूमीवर, मोदींनी देशभरात सुरू असलेल्या भाजपच्या विजयी घोडदौडीचा उल्लेख करताना मुंबई आणि महाराष्ट्राचा संदर्भ दिला.

## महापौरपदासाठी घोडेबाजार पैशांचा खेळ होणार?



वृत्तसंस्था । मुंबई

**महानगरपालिकांचे सर्व निकाल रात्री उशिरा जाहीर झाल्यावर पुढील सत्तेची गणिते जमविण्यास शनिवारपासून सुरुवात झाली. २९ पैकी २३ महानगरपालिकांमध्ये महायुतीचे महापौर संख्याबळानुसार निवडून येऊ शकतात. सहा महानगरपालिकांमध्ये विरोधकांना सत्तेची संधी असली तरी त्यापैकी दोन महापालिकांमध्ये घोडेबाजार होण्याची चिन्हे आहेत.**

राज्यातील २९ पैकी २३ महानगरपालिकांमध्ये भाजपप्रणित महायुतीला बहुतम अथवा अधिक संख्याबळ मिळाले आहे. यामुळे या महानगरपालिकांमध्ये काही गडबड होण्याची शक्यता नाही. मुंबईत भाजपचे ८९ तर शिंदे गटाचे २९ असे (पान २ वर)

लातूरमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले. त्यामुळे तेथे महापौरपदाचा मार्ग मोकळा आहे. वसई विरारमध्ये हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीला बहुमत मिळाले आहे. परभणीमध्ये ६५ सदस्यीय पालिकेत शिवसेना ठाकरे गटाचे २५ तर काँग्रेसचे १२ जण निवडून आले आहेत. भाजपचे १२ तर अजित पवार गटाचे ११ जण निवडून आले असले तरी ३३चे संख्याबळ जमविणे भाजपसाठी आव्हानात्मक असेल.

**थोडक्यात**

### जिल्हा परिषदेत काँग्रेस सर्व जागांवर लढणार

**लातूर ।** राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुती आघाडीने लातूर रेल्वे कोच फॅक्टरीत किती स्थानिक लोकांना नोकरी मिळाली आहे, हे जाहीर केले पाहिजे, असे आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे. तसेच, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये काँग्रेस सर्व जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



### नवनीत राणांची पक्षातून हकालपट्टी होणार?

**नागपूर ।** अमरावती महापालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत २२ भाजप उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून, पक्षाविरोधात प्रचार केल्याच्या आरोपावरून अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे.

## अमेरिकेच्या राजदुतांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीसांची भेट

### • महाराष्ट्रात भागीदारी वाढवण्याबाबत झाली चर्चा

वृत्तसंस्था । मुंबई

**अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जियो गोर यांनी शनिवारी (१७ जानेवारी) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अमेरिकेची महाराष्ट्रातील गुंतवणूक तसेच महाराष्ट्रातील व्यवसायांना अमेरिकेत संधी यावर चर्चा झाल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान व उत्पादन या विषयांवर दोघांमध्ये चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.**



महाराष्ट्र व अमेरिकेतील भागीदारी अधिक दृढ करण्यावर दोन्ही नेत्यांनी लक्ष केंद्रीत केले आहे. व्यापार आणि गुंतवणूक, मनोरंजन, तंत्रज्ञान, उत्पादन, ऊर्जा आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये अमेरिका व महाराष्ट्राची भागीदारी वाढवण्यावर दोघांमध्ये चर्चा झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर चर्चा झाल्यानंतर सर्जियो गोर यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर केली. देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर झालेल्या बैठकीला त्यांनी 'विलक्षण' अनुभव असल्याचे म्हटले. 'महाराष्ट्र व अमेरिकेत महत्वाच्या क्षेत्रांमध्ये भागीदारी वाढवण्याबाबत आमची चर्चा झाली.

महाराष्ट्र व अमेरिकेला एकत्रितपणे खूप काही साध्य करता येऊ शकते', असे सर्जियो गोर म्हणाले. दरम्यान, अमेरिकेची महाराष्ट्रात गुंतवणूक कशी वाढेल व महाराष्ट्रातील व्यवसायांना अमेरिकेत विस्तार कसा करता येईल, या विषयांवर चर्चा झाल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नवी मुंबई इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी (पान २ वर)

## युट्यूबवरून सूचली संकल्पना

# एटीएम मशीन फोडणारे चोरटे शिरपूर पोलिसांच्या जाळ्यात




प्रतिनिधी । शिरपूर

### • धुळे, शिरपूरसह अमळनेरातील एटीएम फोडणारे दोघे अटकेत

**झटपट श्रीमंत होण्यासाठी सोशल मिडीयातील युट्यूबवर एटीएम फोडण्याची कल्पना सूचली. त्यासाठी पिकअप वाहनासह चोरीसाठी लागणारे साहित्य दोघांनी खरेदी केले. अमळनेरात एटीएम साखळीने उचलताना धाडकन झालेल्या आवाजाने नागरिक जागे झाल्यानंतर चोरट्यांना आल्या पावली परतावे लागले.**

धुळ्यातही असाच प्रकार घडल्यानंतर चोरट्यांनी शिरपूरात मोर्चा वळवला मात्र यावेळी सतर्क रिक्षा चालकाने ११२ वर माहिती दिल्यानंतर सतर्क यंत्रणेने पाऊण तास आरोपींचा पाठलाग केल्यानंतर त्यांना अटक करण्यात यश आले. अटकेतील आरोपी धुळ्यासह पारोळा तालुक्यातील रहिवासी आहेत.

हेमंत सुकलाल माळी (२१, भिरडई, धुळे) व विदुर उर्फ विजय देवा जाधव (४०, वसंतनगर, पारोळा) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. आरोपींना न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. आरोपींनी अमळनेरात पंजाब नॅशनल बँकेचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा तसेच धुळे शहर हद्दीतील एचडीएफसी बँकेचे दोन एटीएम फोडण्याचा गुन्हा उघडकीस आला तर शिरपूर शहरातील उपजिल्हा रुग्णालयासमोरील बँक ऑफ बडोदाचे एटीएम फोडत असताना पाठलाग करून त्यांना अटक करण्यात आली हे विशेष !

शनिवार, १७ जानेवारी २०२६ रोजी पहाटे ०२.१५ वाजता शिरपूर (पान २ वर)

## डॅरिल मिचेलने मोडला ४४ वर्षे जुना वर्ल्ड रेकॉर्ड

### वनडे इतिहासात भारताविरूद्ध ३०० धावा करणारा पहिला खेळाडू

वृत्तसंस्था । धरमाला

भारताविरुद्ध न्यूझीलंडने सामन्याची सुरुवात खराब केली, फक्त ५८ धावांत तीन विकेट्स गमावल्या. पण, डॅरिल मिचेलने पुन्हा एकदा डाव सावरला आणि ५६ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केलं. तिथून, त्याने आणि ग्लेन फिलिप्सने अशी भागीदारी साकारली, ज्यामुळे न्यूझीलंडने २०० धावांचा टप्पा ओलांडला. त्यानंतर त्याने फक्त १०६ चेंडूत आपले शतक पूर्ण केलं. त्याने भारताविरुद्ध फक्त १३ सामन्यांमध्ये ही चार शतकं झळकावली.

मिचेलने आता भारतात भारताविरुद्ध सलग पाच वेळा ५० पेक्षा अधिक धावा केल्या असून, त्यापैकी चार डावांमध्ये त्याने शतकं झळकावली आहेत.



# भुसावळ- मिरज, अमरावती- पनवेल अनारक्षित विशेष रेल्वे गाड्या धावणार

## विदर्भ, खान्देशसह पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार

प्रतिनिधी । जळगाव

**प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून मध्य रेल्वेने भुसावळ-मिरज तसेच अमरावती-पनवेल दरम्यान अनारक्षित विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे विदर्भ, खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः सण-उत्सव व सुट्ट्यांच्या कालावधीत प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांसाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे.**



**या विशेष गाड्यांचे थांबे, आगमन-प्रस्थान वेळा तसेच संपूर्ण वेळापत्रकाची सविस्तर माहिती प्रवाशांनी भारतीय रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा एनटीईएस मोबाईल ॲपवर तपासावी, असे आवाहन मध्य रेल्वे भुसावळ मंडळाकडून करण्यात आले आहे. प्रवाशांनी प्रवासापूर्वी अद्ययावत माहिती घेऊन नियोजन करावे, जेणेकरून कोणतीही गैरसोय होणार नाही, असेही रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

मध्य रेल्वे भुसावळ मंडळाकडून मिळालेल्या माहितीनुसार, भुसावळ ते मिरज दरम्यान दोन फेऱ्या चालवण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक ०१२०९ ही विशेष गाडी २३ जानेवारी रोजी भुसावळ येथून दुपारी ०४.५० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ०८.५० वाजता मिरज येथे पोहोचेल. तर परतीची गाडी क्रमांक ०१२१० ही २६ जानेवारी रोजी मिरज येथून सायंकाळी ०७.०० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी १२.३० वाजता भुसावळ येथे पोहोचेल. या गाडीला जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड कॉर्ड लाईन, पुणे, सातारा, कराड, किर्लोस्करवाडी आणि सांगली येथे दोन्ही बाजूने थांबे असतील. तसेच अमरावती ते पनवेल दरम्यानही दोन फेऱ्यांची अनारक्षित विशेष गाडी धावणार आहे. गाडी क्रमांक ०१४१६ ही २२ जानेवारी रोजी अमरावती येथून दुपारी १२ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजता पनवेल येथे पोहोचेल. परतीची गाडी क्रमांक ०१४१५ ही २६ जानेवारी रोजी पनवेल येथून रात्री ७.५० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी १२० वाजता अमरावती येथे पोहोचेल. या गाडीला बडनेरा, (पान २ वर)

## इराणमधील आंदोलनात ५ हजार जणांची हत्या!

वृत्तसंस्था । तेहरान

**इराणमध्ये गेल्या काही दिवसांपासून जोरदार आंदोलन सुरू आहे. या निदर्शनांदरम्यान आतापर्यंत सुमारे ५०० सुरक्षा कर्मचाऱ्यांसह किमान ५ हजार लोकांचा मृत्यू झाला आहे.**

अशी माहिती या भागातील एका इराणी अधिकाऱ्याने रविवारी दिली. यावेळी या अधिकाऱ्याने 'दहशतवादी आणि सशस्त्र दंगलखोर' निष्पाप नागरिकांना लक्ष्य करत असल्याचा आरोप केला. अधिकाऱ्याने सांगितले की, ही आकडेवारी पडताळणी केलेली असून मृतांचा अंतिम आकडा हा फार मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता कमी आहे, असे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.

देशात प्रचंड वाढलेल्या महागाईच्या मुद्द्यावर २८ डिसेंबर रोजी इराणमध्ये निदर्शने सुरू झाली होती आणि पुढील दोन आठवड्यांमध्ये हे आंदोलन चांगलेच पेटले. आंदोलकांकडून इराणमधील राजवट उलथवून टाकण्यासाठी हे आंदोलन केले जात आहे.इराणमधील सरकारकडून हिंसाचारासाठी सातत्याने परकीय शत्रूंना जबाबदार ठरवत आले आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी अमेरिका आणि इस्रायलवर ही अस्थिरता पसरवण्याचा आरोप केला आहे.

## संपादकीय


### विजेत्यांचे अभिनंदन

राज्यातल्या २९ महापालिकांचा निकाल, ज्याच्याकडे केवळ राज्याचे नव्हे तर देशाचेही लक्ष होते तो निकाल आता हाती आला असून त्यात भाजपने बाजी मारल्याचे दिसते आहे. भाजपचे लक्षणीय यश मुंबईमध्ये दिसले. त्यांनी तेथे ठाकरे यांची २५ वर्षांची सत्ता काबीज केली आहे. मुंबईचा किंग कोण हा सगळ्यात कळीचा मुद्दा होता. ठाकरे बंधूंनी ज्या हिरीरीने ही निवडणूक लढवली, ती पाहता भाजपने एकनाथ शिंदे यांच्या मदतीने तेथे जे यश मिळवले ते लक्षणीय म्हणावे लागेल. मतमोजणीच्या दिवशी संध्याकाळी साडेपाच वाजता जी स्थिती होती त्यानुसार २२७ जागांपैकी ११८ पर्यंत भाजप आणि शिंदे यांच्या युतीने जिंकल्या. तर ठाकरे बंधूंच्या युतीला जेमतेम ६९ जागा मिळू शकल्या. त्यात ठाकरे यांच्या शिवसेनेचे यश ६० जागांचे आणि मनसेचे ९ जागांचे आहे. काँग्रेसचे उमेदवार १५ ठिकाणी निवडून आले. मुंबईत काँग्रेसने वंचित बरोबर आघाडी केली आणि वंचितला ६१ जागा देऊ केल्या, पण त्यातील १५ ठिकाणी ते उमेदवारच देऊ शकले नाहीत आणि उर्वरित जागांमध्ये त्यांना कसलीच कर्तबगारी दाखवता आली नाही. मुंबईसाठी भारतीय जनता पक्षाने पद्धतशीर व्युहरचना केली त्यामुळे त्यांना तेथे बाजी मारता आली. ठाकरे बंधूंच्या प्रचाराची सारी भिस्त मराठी मतांवर होती. मुंबईत मराठी माणसांचा टक्का जेमतेम ३० टक्क्यांवर आलेला आहे असे सांगितले जाते, मग फक्त एवढ्याच मतदार समूहावर लक्ष केंद्रित केल्याने उर्वरित ७० टक्के मतदार आपोआपच विरोधात जातात ही बाब बहुदा त्यांनी ध्यानात घेतली नाही. त्यातही भाजपचा चाणाक्षपणा असा की त्यांनी मराठी माणसांच्या मतपेढीत शिंदे सेनेच्या माध्यमातून निर्णायक फूट घडवली. त्याचा फटका ठाकरे बंधूंना बसला आणि त्यानुसार जो अपेक्षित निकाल होता तो लागला. मुंबईतील हे अपयश दोन्ही ठाकरे बंधूंना जिव्हारी लागणारे आहे, त्यातून उभारी घ्यायला त्यांना आता बराच वेळ लागेल. राज्याच्या अन्य भागातील महापालिकांचा विचार करता भारतीय जनता पक्षाने अनेक ठिकाणी एकतर्फी विजय मिळवला. पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही महापालिकांमध्ये भारतीय जनता पक्षाला जे एकतर्फी यश मिळाले ते अचंबित करणारे आहे. पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपला वरचढ जाईल असे चित्र होते आणि पुण्यातही त्यांच्या पक्षाला लक्षणीय यश मिळेल अशी अपेक्षा होती, पण या दोन्ही महापालिकांमध्ये भारतीय जनता पक्षाने पूर्ण वर्चस्व प्रस्थापित करताना विरोधकांचे सगळेच आव्हान मोडीत काढले आहे. आता काही राजकीय विश्लेषक म्हणतात की या दोन्ही महापालिकांच्या निवडणुकांमध्ये प्रत्यक्ष मैदानावर असे चित्र दिसत नव्हते. अजित पवार यांच्या पक्षाच्या बाजूने बर्यापैकी वातावरण होते, त्यामुळे भाजपच्या या यशाचे नेमके गमक काय याचे सर्वच अंगांनी विश्लेषण करायला हवे. या दोन्ही ठिकाणच्या निवडणुका अजित पवार यांनी अत्यंत जिद्दीने लढवताना भारतीय जनता पक्षाच्या कारभाराचे मोठे वाभाडे काढले. पिंपरी चिंचवडला कुत्र्याच्या नसबंदीत पण भाजपने भ्रष्टाचार केला असे नमूद करताना भ्रष्टाचाराचा पाढाच ते तेथील सभांमध्ये वाचून दाखवत होते. पुण्यातल्या सभांमध्येही भाजपच्या गैरकारभाराचे धिंडवडे त्यांनी काढले. त्यांनी नुसता आक्रमक प्रचारच केला नाही, तर काँग्रेस आणि अन्य पक्षाचे प्रबळ उमेदवार त्यांनी आपल्याकडे ओढून भाजपच्या विरोधात मोठे आव्हान निर्माण केले.

# जळगावचा महापौर आरक्षण सोडतीनंतरच ठरणार

## कोणाची लागणार वर्णी...? यावर राजकीय खलबते झाली सुरू

**प्रतिनिधी । जळगाव**



जळगाव शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली असून आता महापौर व उपमहापौर पदासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे.

महापौर पदाचे आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी निघते, यावरच अंतिम निर्णय अवलंबून असल्याने सध्या महायुतीतील नेत्यांमध्ये जोरदार चर्चा व अंतर्गत खलबते सुरू आहेत. आरक्षण सोडतीनंतरच महापौरपदाचे चित्र स्पष्ट होणार असले तरी इच्छुकांची संख्या मोठी असल्याने नेतृत्वाचा कस लागणार आहे. या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असून कमळ चिन्हावर निवडणूक लढवलेल्या भाजपचे सर्व ४६ उमेदवार विजयी झाले आहेत. शिवसेना (शिंदे गट)नेही दमदार कामगिरी करत धनुष्यबाण चिन्हावर लढलेल्या २३ पैकी २२ जागांवर विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)कडून प्रभाग क्रमांक १ मधून प्रफुल्ल देवकर हे एकमेव उमेदवार विजयी झाले. तसेच अपक्ष उमेदवार भारती सागर सोनवणे हे शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा देण्याची शक्यता असल्याने महायुतीचे संख्याबळ ७५ पैकी ७० इतके भक्कम झाले आहे. महायुतीतील समन्वयानुसार महापौर पद भाजपकडे तर उपमहापौर पद शिवसेना शिंदे गटाकडे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दोन्ही पक्षांकडून आतापर्यंत या पदांची संधी न मिळालेल्या जुन्या, निष्ठावंत व तरुण चेहऱ्यांची नावे पुढे येत असून, त्यावर पक्षांतर्गत पातळीवर चर्चा सुरू आहे. भाजपकडे महापौरपदासाठी संभाव्य नावांची यादी तयार असल्याची माहिती मिळत आहे. जळगाव महापालिकेत डॉ. विश्वनाथ खडके हे तिसऱ्यांदा निवडून आले आहेत.

तसेच भाजपचे निष्ठावंत नगरसेवक उज्ज्वला बेंडाळे, शुचिता हाडा, दीपमाला काळे, नितीन बरडे, सुनील वामनराव खडके हे दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. यांच्यासह राजेंद्र घुगे पाटील यांचे नाव महापौरपदाच्या शर्यतीत भाजपकडून आघाडीवर असल्याची माहिती आहे. दरम्यान, शिवसेना उबाठा पक्षातून भाजपमध्ये प्रवेश केलेले नितीन लद्धा, सुनील महाजन व जयश्री महाजन यांना महापालिकेतील पदांऐवजी संघटनात्मक पातळीवर महत्त्वाची जबाबदारी देण्यात येण्याची शक्यता आहे. आरक्षण सोडत जाहीर होताच महापालिकेतील सत्तास्थापनेचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे . याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

## अमृत प्री-स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**प्रतिनिधी । जळगाव**

गुजराल पेट्रोल पंप परिसरातील गौरवास्पद अमृत प्री-स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी चिमुकल्यांनी सादर केलेल्या सत्ययुग ते कलियुग एक मानवी देहाचा प्रवास या विशेष नाटकाने उपस्थितांची मने जिंकून घेतली. शनिवार, १० जानेवारी रोजी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वैशाली गालापुरे, व्हि. टी. गालापुरे(सेवानिवृत्त प्राचार्य) होते. प्रमुख पाहुणे म्हणून धरणगाव पी. आर. हायस्कूलचे डायरेक्टर रामदास अलई (चांदवड) उपस्थित होते. व्यासपीठावर शाळेच्या प्राचार्या पुजा अमृतकर व चेअरमन धनंजय अमृतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. स्नेहसंमेलनात बालगोपालांनी आपल्या कलागुणांचे बहारदार सादरीकरण केले.

## निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यावर चाकूने हल्ला; दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । जळगाव**

**शहरात मेहरूण तलावाजवळील पुलावर एका निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यावर चाकूने प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी विजय सुकलाल जोशी (वय ६५, रा. शिवबानगर, कोल्हे हिल्स, जळगाव) हे १६ जानेवारी २०२६ रोजी रात्री १०:३० वाजेच्या सुमारास मेहरूण तलावाजवळील पुलावरून जात होते. यावेळी संशयित आरोपी अनंत प्रमोद गोंडे आणि अनिल शंकर लागवणकर (दोन्ही राहणार जोशी कॉलनी, जळगाव) हे कोणत्याही कारणाशिवाय शिवीगाळ करत होते. जोशी यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता, दोघांना त्याचा राग आला. संतापलेल्या आरोपींनी आपल्याजवळील चाकूने जोशी यांच्या पोटावर डाव्या आणि उजव्या बाजूला वार करून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. या घटनेनंतर विजय जोशी यांनी एम.आय. डी.सी. पोलिसात तक्रार दिली आहे.या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## व. वा. वाचनालयात ‘अभिवाचन’ कार्यशाळा मोठ्या उत्साहात

**प्रतिनिधी । जळगाव**



**येथील व. वा. जिल्हा वाचनालयाच्या महिला समितीतर्फे महिला, पुरुष व शालेय विद्यार्थ्यांसाठी ‘अभिवाचन कार्यशाळा’ रविवार दि. १८ जानेवारी रोजी दुपारी १ ते ५ या वेळात या मोठ्या उत्साहात संपन्न झाली या कार्यशाळेत ४५ व्यक्तींनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.**

वाचनालयाच्या कै. रा. ग. मानुधने युवा व बाल ग्रंथालय विभागात झालेल्या या कार्यशाळेचे उद्धाटन वाचनालयाचे कार्याध्यक्ष अनिलकुमार शाह यांचे हस्ते दीपप्रज्वलन व नटराजाचे प्रतिमेस माल्यार्पण करून करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला समितीच्या निमंत्रक संगीता अट्रावलकर यांनी केले तर कार्यशाळेत उपस्थित प्रशिक्षक प्रा. हनुमान सुरवसे यांचे स्वागत वाचनालयाचे कार्याध्यक्ष अनिलकुमार शाह यांनी तर मंजुषा भिडे यांचे स्वागत संगीता अट्रावलकर यांनी गुलाब पुश देवून केले प्रशिक्षकांचा परिचय प्राजक्ता शिरुडे यांनी करून दिला. प्रशिक्षक हनुमान सुरवसे व मंजुषा भिडे यांनी अभिनय म्हणजे काय हे सांगतानाच अभिनयाचे वाचिक अभिनय, कायिक अभिनय, सात्विक अभिनय व आहार्य अभिनय हे प्रकार प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजावून सांगीतले तसेच बोलण्याच्या मध्यमातुन आवाजातील चढ-उतार शब्दोच्चार दोन व्यक्तीतील संवाद त्यातील वाक्ये हि अभिनयाच्या माध्यमातून व हावभावातून व्यक्त करता आली पाहिजे त्याचबरोबर आपली देहबोली व भावना प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आत्मविश्वासाने वाचन केले पाहिजे. त्यासाठी अवघड शब्द वाचनाचा सराव केला पाहिजे असे प्रतिपादन केले प्राध्यापक हनुमान सुरवसे व मंजुषा भिडे या दोनही प्रशिक्षकांनी पाच तास विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास वाचनालयाच्या चिटणीस प्रा. डॉ. शुभदा कुलकर्णी, लीना लेले, गीता रावतोळे या समितीसदस्य उपस्थित होत्या कार्यक्रम यशस्वीतेसाठी वाचनालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता शिरुडे यांनी केले तर आभार प्रदर्शन गीता रावतोळे यांनी केले.

## पान १ वरुन

**महापौरपदासाठी घोडेबाजार......**

११८ संख्याबळ होते. म्हणजेत साध्या बहुमतापेक्षा अधिक संख्याबळ आहे. तरीही भाजपकडून अन्य काही नगरसेवकांची मते मिळविण्याचा प्रयत्न होऊ शकतो. एमआयएमने तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला तरी तो महायुतीलाच फायदेशीर ठरू शकतो. सांगलीमध्ये भाजपला बरोबर निम्म्या जागा मिळाल्या आहेत. अजित पवार गटाचे १६ तर शिंदे गटाचे दोन नगरसेवक आहेत. तेथे १८ नगरसेवक निवडून आलेल्या काँग्रेसने गणित जुळविण्याची चाचपणी सुरू केली आहे. पण ते कठीण दिसते. अकोल्यात बहुतमसाठी दोन जागा कमी असल्या तरी भाजप संख्याबळ जमवू शकेल. चंद्रपूर, भिवंडीमध्ये चुरस - खरी चुरस ही चंद्रपूर आणि भिवंडीमध्ये आहे. चंद्रपूरमध्ये ६६ सदस्यीय पालिकेत काँग्रेसचे सर्वाधिक २७ तर भाजपचे २३ जण निवडून आले आहेत. महापौरपदासाठी ३४ मतांची आवश्यकता आहे. ठाकरे गटाचे सहा तर शरद पवार गटाचा एक अशा रितीने बहुमताचा आकडा गाठण्याची तयारी काँग्रेसने केली आहे. अपक्षांमधील दोन काँग्रेसचे बंडखोर आहेत. चंद्रपूरमध्ये महापौर हा काँग्रेसचाच होईल, असा ठाम विश्वास काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. भिवंडी-निजामपूरा महानगरपालिकेत कोणाची काहीच खात्री देता येत नाही. ९० सदस्यीय महानगरपालिकेत सर्वाधिक ३० नगरेसवक हे काँग्रेसचे निवडून आले आहेत. भाजप २२, शिंदे गट १२, शरद पवार गट १२, इतर १४ जण निवडून आले आहेत. यापूर्वी काँग्रेसचे सर्वाधिक ४० नगरसेवक निवडून येऊनही पक्षात फूट पडून अपक्ष महापौर झाला होता. काँग्रेसने शरद पवार गट व अन्य पक्षांना बरोबर घेऊन ४५ चा आकडा गाठण्यासाठी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. स्थानिक आघाड्यांचे पैशांचे राजकारण येथे अधिक प्रभावी ठरते. यामुळेच कोणत्या पक्षाचा महापौर निवडून येईल याबाबत काहीच स्पष्टता नाही.

**एटीएम मशीन फोडणारे......**

उपजिल्हा रुग्णालयासमोरील बँक ऑफ बडोदाच्या एटीएमला लोखंडी साखळी बांधून पिकअप वाहनाने ओढून चोरी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती गस्तीवरील पोलिसांना मिळताच त्यांनी धाव घेतली मात्र पोलिस येण्याची भनक लागताच संशयीत वाहनासह पसार झाल्यानंतर पोलिसांनी पाठलाग सुरू केला. शिरपूर तालुका व थाळनेर पोलिसही अलर्टवर असल्याने आरोपींचा मध्यप्रदेशात पळण्याचा मार्ग बंद झाला तर आरोपींनी पोलिसांना पाहून थेट शहादा फाट्याकडे पलायन केले. शिरपूर तालुक्याचे निरीक्षक जयपाल हिरे व थाळनेर एपीआय हेमंत पाटील यांनीही आरोपींचा पाठलाग केला. मुंबई-आग्रा महामार्गावर नाकाबंदीवरील बॅरिकेट्स उडवत आरोपी दहिवद गावात शिरले व महामार्गावर आल्यानंतर त्यांनी पाठशिवणीचा खेळ सुरू केला. पिकअपला बांधलेली २० फूटाची लोखंडी साखळी रस्त्यावर घासली गेल्याने चिंगाऱ्या उडत होत्या मात्र पोलिसांनी जीवाची पर्वा न करता पाठलाग कायम ठेवला व आरोपींनी चालत्या वाहनातून उड्या मारून पळ काढला मात्र तपासचक्र फिरताच आरोपींना अटक करण्यात यश आले. यांनी आवळल्या चोरट्यांच्या मुसक्या - धुळे पोलिस अधीक्षक श्रीकांत धीवरे, अपर पोलिस अजय देवरे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर शहर पोलिस निरीक्षक किशोरकुमार परदेशी, पोलिस उपनिरीक्षक संदीप दरवडे, हवालदार रवींद्र आखडमल, राजेंद्र रोकडे, कॉन्स्टेबल आरीफ तडवी, सचिन वाघ, जितेंद्र अहिरराव, योगेश दाभाडे, गोविंद कोळी, भटू साळुंके, विनोद आखडमल, मनोज महाजन, प्रशांत पवार, सोमा ठाकरे, मनोज दाभाडे, चालक रवींद्र महाले अशांनी आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

**अमेरिकेच्या राजदूतांनी घेतली......**

प्रकल्पावर यावेळी चर्चा झाली. तसेच महाराष्ट्र भागीदारी अधिक वाढवण्यासाठी दोन्ही नेत्यांनी इच्छुक असल्याचे सांगितले. दरम्यान, सर्जियो गोर यांनी रिझर्व बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची मुंबईत भेट घेतली. तंत्रज्ञान क्षेत्रावर गोर यांनी मल्होत्रा यांच्याशी चर्चा केली. गोर यांनी मुंबईतील गेटवे ऑफ इंडियालाही भेट दिली. त्यांनी तिथे एक सेल्फी काढला. तो त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे. तसेच गोर यांनी मुंबईतील यूएस कॉन्सूलेटला भेट दिली. राजदूत झाल्यानंतर गोर पहिल्यांदाच मुंबई दौऱ्यावर आले.

**भुसावळ- मिरज, अमरावती- ......**

मुर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड कॉर्ड लाईन, पुणे, लोणावळा आणि कर्जत येथे दोन्ही बाजूने थांबे देण्यात आले आहेत. मध्य रेल्वेच्या भुसावळ मंडळाकडून प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून दोन विशेष अनारक्षित गाड्या चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या दोन्ही विशेष गाड्यांची रचना प्रवाशांच्या सोयीसाठी करण्यात आली असून, प्रत्येकी १६ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे आणि दोन सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन अशा एकूण १८ डब्यांचा समावेश असणार आहे. संपूर्ण गाडी अनारक्षित स्वरूपाची असल्याने तिकीट उपलब्धतेचा ताण कमी होऊन सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः अल्प व मध्यम अंतर प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी या गाड्या अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

# बसच्या धडकेमुळे दुचाकीस्वार कंटेनरखाली चिरडला

## एकाचा मृत्यू, एक गंभीर जखमी, जळगाव-औरंगाबाद महामार्गावरील कंडारी फाटा येथे घटना

**प्रतिनिधी । जळगाव**



**जळगाव-औरंगाबाद महामार्गावरील कंडारी फाटा (उमाळा) येथे शनिवारी दुपारी एका रस्ते अपघातात ६० वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली आहे. भरधाव बसने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने हा अपघात घडला.**

प्रल्हाद अमृत बाविस्कर (वय ६०, रा. मण्यारखेडा, ता. भुसावळ) हे पत्नी सुनिताबाई प्रल्हाद बाविस्कर (वय ५२) यांच्यासह त्यांच्या ‘स्प्लेंडर प्लस’ मोटारसायकलने (क्रमांक: एमएच १९ ईडी ९३३९) उमाळा फाट्याकडून मण्यारखेड्याकडे जात होते. दुपारी ४:४० वाजेच्या सुमारास, पाठीमागून येणाऱ्या बसने (क्रमांक: एम एच १९ ७४०१) बाविस्कर यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दुचाकीवरील प्रल्हाद बाविस्कर हे जळगावकडून येणाऱ्या एका कंटेनरच्या पुढच्या चाकाखाली आदळले. कंटेनरचे चाक डोक्यावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात प्रल्हाद बाविस्कर यांच्या पत्नी सुनिताबाई यादेखील रस्त्यावर फेकल्या गेल्या. त्यांच्या हाता-पायाला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातात त्यांच्या दुचाकीचेही मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले आहे. याप्रकरणी मृताचे चुलत भाऊ बाबुराव नामदेव बाविस्कर (वय ६७) यांनी एमआयडीसी पोलीस स्टेशन, जळगाव येथे फिर्याद दिली. पोलिसांनी बस चालक सचिन भारत बागुल (वय ४१, रा. रावेर) याच्याविरुद्ध हलगर्जीपणाने आणि भरधाव बस चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस हेड कॉन्स्टेबल मुकुंद पाटील एमआयडीसी पोलीस स्टेशन, जळगाव हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## बहिणाबाई महोत्सव २३ जानेवारीपासून

**प्रतिनिधी । जळगाव**

खान्देशाच्या लोकसंस्कृतीला व्यासपीठ देणारा, बचत गटाच्या महिलांना आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेला बहिणाबाई महोत्सव २०२६ यंदा दि. २३ ते २७ जानेवारी या कालावधीत (पाच दिवस) सागर पार्क, जळगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव खान्देशाच्या सांस्कृतिक चळवळीला चालना देणारा ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. यंदा या महोत्सवाचे ११ वे वर्ष असून भरारी बहुउद्देशीय संस्था व क्रेडाई जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती क्रेडाई जळगावचे जिल्हाध्यक्ष दीपक सराफ व भरारी फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक परदेशी यांनी दिली. नटवर शॉपिंग मॉल येथील भरारी फाउंडेशनच्या कार्यालयात आयोजित पत्रपरिषदेत ते बोलत होते.

# जळगाव जनता बँकेचा महिला मेळावा उत्साहात साजरा

**प्रतिनिधी । जळगाव**




**सहकार क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असलेल्या जळगाव जनता सहकारी बँकेतर्फे मकर संक्रांतीचे औचित्य साधून महिला मेळावा व हळदी-कुंकू कार्यक्रम बालगंधर्व खुले नाट्यगृह येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे उपाध्यक्ष डॉ. अतुल सरोदे होते. मंचावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. वृषाली छापेकर उपस्थित होत्या. पारंपरिक पद्धतीने हळदी-कुंकूने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.**

अध्यक्षीय भाषणात डॉ. अतुल सरोदे यांनी बचत आणि कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. बचत गट म्हणजे एक मजबूत टीम असून प्रत्येक सदस्याकडे असलेल्या कौशल्यांचा योग्य वापर करून व्यवसायाला नवी दिशा देता येते, असे त्यांनी सांगितले. बचत गटातील सर्व सदस्यांचे कलागुण ओळखून गटाचा सर्वांगीण विकास करावा, उत्पादनाचे आकर्षक पॅकिंग करून प्रभावी मार्केटिंग करावे, तसेच एकमेकांना प्रेरणा देत व्यवसायाची नवी उंची गाठावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. वृषाली छापेकर यांनी महिलांच्या बचत क्षमतेवर आणि नियोजन शक्तीवर प्रकाश टाकला.

या महिला मेळाव्यास जवळपास पंधराशे महिलांची उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेच्या संचालिका संध्याताई देशमुख यांनी केले तर सूत्र संचलन व पाहुण्यांचा परिचय बँकेच्या अधिकारी ममता पाटील यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन बँकेचे उपमहाव्यवस्थापक नितीन चौधरी यांनी केले. पसायदान ने कार्यक्रमाची सांगता झाली.

महिला कुटुंबवत्सल असून छोट्या छोट्या गोष्टींतून काटेकोर बचत करतात; मात्र केवळ बचतीपुरते मर्यादित न राहता त्या बचतीतून उद्योग कसा उभारता येईल, कमी गुंतवणुकीतून मोठा विचार कसा करता येईल, याबाबत त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. स्टार्टअप इंडिया उपक्रमाला दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर जळगाव शहरातून दहा हजार स्टार्टअप सुरू करण्याचा संकल्प सर्वांनी करावा, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास बँकेच्या संचालिका संध्याताई देशमुख, माजी संचालिका शोभाताई पाटील, तसेच वरिष्ठ महाव्यवस्थापक सुनील अग्रवाल यांची उपस्थिती होती.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# धुळे रेल्वेस्थानकावर सुशोभीकरणाची कामे पूर्ण

## नवे फलाट, आधुनिक सुविधांनाही मिळाली गती

प्रतिनिधी । धुळे

**केंद्र सरकारच्या अमृत भारत स्टेशन योजना अंतर्गत धुळे रेल्वे स्थानकाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली असून, स्थानकावर विविध पायाभूत सुविधा व सुशोभीकरणाची कामे सध्या सुरू आहेत. मध्यम व महत्त्वाच्या स्थानकांमध्ये धुळे स्थानकाचा समावेश असून, या योजनेमुळे प्रवाशांना आधुनिक, सुरक्षित व स्वच्छ सुविधा उपलब्ध होणार आहेत. योजनेअंतर्गत नव्या फलाटांचे बांधकाम सुरु असून विद्यमान फलाटांचे उंचीकरण व रुंदीकरण जवळपास पूर्ण झाले आहे.**




**नवी कामे युद्ध पातळीवर सुरु**

**पुढील टप्प्यात नव्या व प्रस्तावित कामांनाही मंजुरी देण्यात आली असून, त्यामध्ये नव्या प्रवेश व निर्गमन मार्गांची उभारणी, मल्टी लेव्हल पार्किंग सुविधा, स्थानकाबाहेरील परिसराचे सुशोभीकरण, फूड कोर्ट, आधुनिक प्रतीक्षालय, डिजिटल तिकीट व माहिती काउंटर, एटीएम, मेडिकल रूम व मदत कक्ष यांचा समावेश आहे. डिजिटल सुविधांमध्ये डिजिटल डिस्प्ले बोर्ड, वाय फाय, मोबाईल अ‍ॅपशी संलग्न ट्रेन माहिती व पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टीमचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे अशी माहिती सूत्रांनी दिली.**

स्थानकावरील जुने शेड (गुड्स शेड) काढून त्या जागी नव्या फलाटासाठी काम सुरु झाले असून या ठिकाणीही आता नवे शेड वाढवण्याची कामे सुरू हिलोय शकतील. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी पायवाट व रेलिंग उभारण्याचेही नियोजन असून प्रवासी सुविधांमध्ये प्रामुख्याने दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प, स्वच्छ व आधुनिक शौचालये तसेच पिण्याच्या पाण्याची सुधारित व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण स्थानकाच्या सुशोभीकरणात भर घालण्यासाठी एलईडी प्रकाश व्यवस्था, स्थानिक संस्कृती दर्शवणारी भित्तीचित्रे, स्थानक इमारतीचे नूतनीकरण व रंगकाम तसेच हिरवळ व वृक्षारोपणाची कामे करण्यात आली आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे, फायर सेफ्टी सिस्टीम आणि आपत्कालीन उद्घोषणा यंत्रणा बसवण्यात येत आहेत.

पर्यावरणपूरक दृष्टीकोनातून सोलर पॅनल बसवण्यात आले आहे. याठिकाणी पावसाचे पाणी साठवण व ऊर्जा बचत करणारी उपकरणे वापरण्यात येणार आहेत अशी माहिती यावेळी देण्यात आली. नव्या फलाट कामामुळे भविष्यात या स्थानकावरून आणखी नव्या गाड्या सुरु होण्याची आणि प्रवाशी सेवा अधिक परिणामकारक राहण्याची शक्यता वाढली आहे. या योजनेमुळे धुळे रेल्वे स्थानकाचा टप्प्याटप्प्याने विकास होऊन प्रवाशांना अधिक सुरक्षित, स्वच्छ व आधुनिक सुविधा मिळणार असून, स्थानिक रोजगार व आर्थिक हालचालींना चालना मिळणार आहे.

दरम्यान, अमृत भारत स्टेशन योजनेतील कामांमुळे धुळे रेल्वे स्थानकाचे स्वरूप हळूहळू बदलत असून प्रवाशांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

गेल्या काही वर्षांत वाढलेल्या प्रवासी संख्येचा विचार करता नव्या फलाटांमुळे गर्दीचे नियोजन अधिक सुलभ होणार आहे. तसेच रेल्वे गाड्यांचे थांबे, वेळापत्रक आणि प्रवासी वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत मिळणार असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले. भविष्यात मनमाडइंदूर रेल्वे मार्गासह इतर महत्त्वाच्या मार्गांवरील गाड्यांसाठी धुळे स्थानक एक महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होणार असल्याचेही संकेत मिळत आहेत.

# लाडशाखीय वाणी समाजातर्फे पालिकेतील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान




प्रतिनिधी । धुळे

**वाणी समाजाचे समाजिक, शैक्षणिक, राजकीय अशा विविध क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. आपल्या समाजाबरोबरच इतर समाजाच्या प्रगतीसाठी त्यांचे दायित्व उल्लेखनिय आहे. त्यांच्या व्यवहार कौशल्यातून मानवी जीवनात शिस्तीच पाठ आपल्याला मिळत असतो. असे प्रतिपादन माजीआ. कुणाल पाटील यांनी केले.**

धुळे येथे नुकताच लाडशाखीय वाणी समाजातील नगरपरिषद, नगरपालिका निवडणूकीत निवडून आलेल्या नगरसेवक तसेच पदाधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

सन्मान सोहळ्याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. भाजपाचे जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, माजी जि.प.सदस्य आशुतोष पाटील आदी उपस्थित होते. सन्मान सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी कपूरचंद बाविस्कर, यशवंत येवलेकर, राजेंद्र चितोडकर, राजेंद्र पाचपुते, योगेश कोठावदे यांच्यासह लाडशाखीय वाणी समाजातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ नेते डॉ. सुभाष भामरे, आ. अनुप अग्रवाल, माजी आ. कुणाल पाटील, ज्येष्ठ नेते गोपाळराव केले आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात योगेश नेरकर उपनगराध्यक्ष पिंपळनेर, नगरसेवक डॉ. दयानंद कोतकर (पिंपळ नेर), नगरसेवक शरद पाटे (पाचोरा), योगिता येवले (भडगाव), भूषण टीपरे (पारोळा), अमोल शिरोळे (पारोळा), निर्मला वाणी (पारोळा), वंदना शिरोळे (पारोळा), प्राजक्ता कोठावदे (पारोळा), स्वाती शिरोडे (चाळीसगाव), विनोद कोठावदे (पिंपळनेर) या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात

### एकतानगरात मारहाण, गुन्हा दाखल

**नंदुरबार ।** शहरातील एकता नगरमध्ये कारण नसतांना मोहिनी दिलीप अल्हाट यांना राहुल ऊर्फ पप्पु मराठे, विपुल ऊर्फ बंट्टी मराठे, कमलेश ऊर्फ चिंग्या मराठे, कपिल मराठे यांनी मारहाण केली. यात वृषाली प्रल्हाद आल्हाट, प्रियंका प्रल्हाद आल्हाट हे दुखापती झाले. तसेच मोहिनी आल्हाट यांचे पती, मुले व पुतण्या यांना हाताबुक्यांनी तसेच प्लास्टिक ड्रमच्या झाकणाने मारहाण करुन दुखापती केली. याबाबत उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोसई विकास पाटील करीत आहेत.

### ‘येलो डे’ उत्साहात साजरा

**शिरपूर ।** येथील अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूलमध्ये मकरसंक्रांत व येलो डे उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता उगले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. नर्सरी, ज्युनिअर व सीनियर वर्गातील विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक व आनंददायी उपक्रमांत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना मकरसंक्रांत सणाची माहिती देण्यात आली तसेच पतंग बनविणे, सजावट व पझल सोडवणे असे उपक्रम घेण्यात आले. येलो डेनिमित्त पिवळ्या रंगाची ओळख करून देत विद्यार्थ्यांचे रंगज्ञान, निरीक्षणशक्ती व आत्मविश्वास वाढविण्यात आला. संपूर्ण शाळेचे वातावरण आनंदी व पिवळ्या रंगाने उजळून निघाले.

### भाजपा विजयाचा धुळे ग्रामीणमध्ये आनंदोत्सव

**धुळे ।** महापालिका निवडणूकीत भाजपाने निर्विवाद बहुमत मिळविल्या बद्दल जल्लोष धुळे ग्रामिणमध्ये करण्यात आला. आ. राम भदाणे यांनी या निवडणूकीत निर्णायक भूमिका बजाविल्याने विजेत्या उमेदवारांनी त्यांची भेट घेतली. आमदार भदाणे यांच्याकडून विजेत्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. आ. अनुप अग्रवाल यांच्यावर जनतेचा असलेला सार्थ विश्वास आणि विकासासाठी अविरत प्रयत्न यामुळेच हे घवघवीत यश मिळाले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, माजी सभापती प्रा. अरविंद जाधव, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब भदाणे आदी उपस्थित होते.

# नवापूर शहरात गणेश जयंतीला ऐतिहासिक गाव जेवण

प्रतिनिधी । नवापूर

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एकहाती सत्ता मिळाली, तर गणपती बाप्पाच्या नावाने गावजेवण घालीन, असे साकडे मी गणरायाला घातले होते. जनतेच्या कौलाने, त्यांच्या आशीर्वादाने आणि गणपती बाप्पाच्या कृपेने ते साकडे पूर्ण झाले, अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते भरत माणिकराव गावित यांनी व्यक्त केल्या. नवापूर नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला घवघवीत यश मिळत एकहाती सत्ता प्राप्त झाली आहे.**

या ऐतिहासिक विजयाचा आनंद आणि येत्या गुरुवारी साजरी होणारी गणेश जयंती या दुहेरी आनंदाच्या पर्वाचा साक्षीदार नवापूर शहर ठरणार आहे. या निमित्ताने गुरुवार, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी भरत गावित यांच्या वतीने नवापूर शहरात भव्य भंडारा व महाप्रसाद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नवापूर शहराचे आराध्य दैवत असलेल्या गणपती मंदिरात सायंकाळी ७ वाजेपासून महाप्रसादाला सुरुवात होणार आहे. गणेश जयंतीच्या पावन पर्वावर आयोजित या महाप्रसादाचा लाभ नवापूर शहरातील सर्व मायबाप जनतेने घ्यावा, असे आवाहन भरत माणिकराव गावित यांच्या वतीने करण्यात आले आहे.





राजकारणासोबत सामाजिक बांधिलकी जपणारा हा सोहळा सध्या नवापूर शहरात चर्चेचा विषय ठरत आहे.

**विजयाचा आनंद आणि गणपती बाप्पाचा आशीर्वाद शहरातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावा, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबवण्यात येत आहे. विशेष बाब म्हणजे या सोहळ्यात गरजू, वृद्ध व दिव्यांग नागरिकांसाठी घरपोच मप्रसादाचा डबाफही अभिनव संकल्पना राबवली जाणार आहे. शारीरिक अडचणींमुळे मंदिरात येऊ न शकणाऱ्या नागरिकांना स्वयंसेवकांच्या माध्यमातून त्यांच्या घरीच महाप्रसाद पोहोचवण्यात येणार आहे. सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मीय ऐक्याचे दर्शन घडवत, मुस्लिम बांधवांसाठी इस्लामपूरा व डिंगबर पाडवी ग्राऊंड येथे स्वतंत्र भोजन व्यवस्थाही करण्यात आली आहे. राजकीय विजयासोबतच माणुसकी, समता व बंधुभाव जपणारा हा उपक्रम नागरिकांकडून विशेष कौतुकास पात्र ठरत आहे.**

# साहस, सेवा, शिस्तीचा संगम; ट्रेनिंग, ट्रेकिंग, टीमवर्कचा अनुभव




प्रतिनिधी । नवापूर

नवापूर येथील श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित एक दिवसीय गाईड शिबिर वासरवेल येथे उत्साहात पार पडले. शिबिराचा शुभारंभ उपमुख्याध्यापक ए. एन. सोनवणे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. यावेळी पर्यवेक्षक हरीश पाटील, पर्यवेक्षक जी. डी. सूर्यवंशी, ज्येष्ठ शिक्षक अशोक रजाळे, स्काऊट प्रमुख गोविंदा कोळी, गाईड प्रमुख शोभा मोहने आदी मान्यवर उपस्थित होते.

नवापूर येथून एस.टी. बसने प्रवास करून वासरवेल येथे पोहोचल्यानंतर शिबिरास सुरुवात झाली. प्रारंभी गाईड विद्यार्थिनींच्या हस्ते झेंडा वंदन, त्यानंतर गाईड प्रार्थना, झेंडा गीत, बी.पी.चे व्यायाम प्रकार तसेच विविध गीते सादर करण्यात आली. पुढे परिसर स्वच्छतेचा उपक्रम राबवून स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. दुपारच्या सत्रात गाईड विद्यार्थिनींनी चुलीवर स्वयंपाक करून स्वावलंबनाचा अनुभव घेतला. यावेळी मुख्याध्यापिका कमल कोकणी, उपमुख्याध्यापक ए. एन. सोनवणे, ज्येष्ठ शिक्षक अशोक रजाळे व सुभाष पाटील यांनी शिबिराला भेट देऊन विद्यार्थिनींच्या उपक्रमांचे कौतुक केले. शिबिरात साहसी व शारीरिक उपक्रमां अंतर्गत झाडावर चढणे, ट्रेकिंग घेण्यात आले. तसेच आपत्ती व्यवस्थापन या विषयावर स्ट्रेचर तयार करणे, रुग्णांची ने-आण, हात व डोक्याचे बंधन, स्पर्श व गंध ओळख यांसारख्या उपयुक्त व जीवनोपयोगी प्रशिक्षण उपक्रमांची माहिती देण्यात आली. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी शिबिराची रंगतदार सांगता करण्यात आली.

**शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विषय प्रमुख शोभा मोहने, स्काऊट शिक्षिका विद्या काळे, सरला गावित, विद्या वळवी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच कल्पना वसावे, शोभा गिरासे, अर्चना बिरारी, वैशाली पाटील, दिपाली कुवर, स्मिता वसावे यांनीही सक्रिय सहभाग नोंदवून शिबिराच्या यशात मोलाचा वाटा उचलला. या गाईड शिबिरामुळे विद्यार्थिनींमध्ये शिस्त, स्वावलंबन, नेतृत्वगुण व सामाजिक जबाबदारी विकसित होण्यास निश्चितच चालना मिळाली. विद्यार्थिनींमध्ये संघभावना, आत्मविश्वास आणि संकटांना सामोरे जाण्याची क्षमता अधिक बळकट झाली. प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. अशा उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच सामाजिक जाणिवा दृढ होतात असे मग पालकांनी उपस्थित होते.**

# विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित करण्यासाठी महोत्सव महत्त्वपूर्ण

## अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । तळोदा

**विद्यार्थ्यांच्या अंगी उपजत गुण असतात. योग्य वयात योग्य मार्गदर्शन मिळाल्यास त्यांचा सर्वांगीण विकास होतो. अशा स्वरूपाचे महोत्सव विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात, असे प्रतिपादन आदिवासी विकास विभाग, नाशिक आयुक्तालयाचे अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांनी केले.**

रांझणी (ता. तळोदा) येथील विद्यावर्धिनी निवासी आश्रमशाळेत श्री साईनाथ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित तीन दिवसीय कर्मण्य महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार राजेश पाडवी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अनय नावंदर, भाजप जिल्हाध्यक्ष निलेश माळी, माजी नगराध्यक्ष अजय परदेशी, प्रदेश सदस्य प्रा. पंकज पाठक, जिल्हा महामंत्री कैलास चौधरी, नगरसेविका जयश्री महाले, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रशांत पाटील, संजय पटेल, विलास डामरे, गौरव वाणी, संजय वाणी आदी मान्यवर उपस्थित होते.





प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष डॉ. शशिकांत वाणी यांनी कर्मण्य महोत्सवामागील भूमिका स्पष्ट करताना कर्म करत राहा, फळाची अपेक्षा न ठेवता कर्तव्य पार पाडा, हा भगवंताचा उपदेश असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांचे अध्ययन हे त्यांचे कर्म असून ज्ञानदान हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडावा या उद्देशाने दरवर्षी हा महोत्सव आयोजित केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रकल्प अधिकारी अनय नावंदर यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगत, यातून राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडतील, असा विश्वास व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात आमदार राजेश पाडवी यांनी शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्राकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. खेलो इंडिया स्पर्धेत आदिवासी खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतात, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

दुपारच्या सत्रात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते मशाल प्रज्वलन करून स्पर्धांचे उद्घाटन झाले. कोठार व रांझणी येथील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे संघ स्पर्धांमध्ये सहभागी झाले. संध्याकाळी जिल्हा परिषद सदस्य प्रताप वसावे यांचे संस्कृती व संस्कार या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान झाले.

कार्यक्रमास संस्थेचे सचिव गुलाबराव चव्हाण, निसारअली मक्राणी, सुनीता वाणी, आदित्य मालपुरे, सायली मालपुरे, जगन मराठे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन अविनाश मराठे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी परिश्रम घेतले.

### माजी विद्यार्थ्यांचा गौरव ठरला लक्षवेधी

श्री साईनाथ शिक्षण संस्थेच्या गेल्या ३० वर्षांच्या कार्यकाळात कोठार व रांझणी आश्रमशाळेत शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असलेल्या सुमारे ५० माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. डॉक्टर, वकील, शिक्षक, पोलिस, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य तसेच लोकप्रतिनिधी पदांवर कार्यरत असलेले हे माजी विद्यार्थी संस्थेची खरी कमाई असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# जिल्हा रुग्णालयात सव्वादोन लाखांहून अधिक रुग्णांवर उपचार : डॉ. देगावकर

प्रतिनिधी । धुळे

धुळे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या धुळे जिल्हा शासकीय रुग्णालयात एप्रिल ते डिसेंबर २०२५ या आठ महिन्यांच्या कालावधीत २ लाख ३८ हजार ८८० रुग्णांवर औषधोपचार करण्यात आले आहेत.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्ता देगावकर यांनी ही माहिती दिली आहे. धुळे शहरात साक्री रोडवर धुळे जिल्हा शासकीय रुग्णालयाची इमारत आहे. या रुग्णालयात बाह्य रुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, प्रसुती, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, इसीजी, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, क्ष-किरण तपासणी (एक्स रे), सिटी स्कॅन, सोनोग्राफी, गर्भवती तपासणी, लसीकरण, रक्ताच्या विविध चाचण्यांची तपासणी, कार्डियाक कॅथ लॅब आदी सुविधा उपलब्ध आहेत. त्यासाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी जिल्हा रुग्णालयाच्या सेवेत आहेत. दाखल होणाऱ्या रुग्णांना अखंड सेवा दिली जाते. मागील आठ महिन्यांच्या कालावधीत बाह्यरुग्ण विभागात (जझऊ) २ लाख ३८ हजार ८८० रुग्णांनी उपचार घेतले, तर आंतररुग्ण विभागात ६ हजार ६० रुग्ण दाखल होऊन त्यांना वैद्यकीय सेवा देण्यात आली. रुग्णालयात ६८५ महिलांची प्रसुती झाली. त्यापैकी ९७ महिलांची सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे सुरक्षित प्रसुती करण्यात आली आहे. रुग्णालयात विविध शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यात कुटुंब नियोजनाच्या ७७शस्त्रक्रिया करण्यात आल्या. याशिवाय ८० अँजिओग्राफी, २१ हजार ४६३ रुग्णांचे एक्स-रे, १८ हजार १२१ सिटी स्कॅन, ७ हजार ३ सोनोग्राफी तपासणी व ५ हजार ९०७गरोदर मातांची तपासणी करण्यात आली आहे. रुग्णालयात विविध लसीकरणाच्या सेवा पुरविण्यात येतात. त्यानुसार २ हजार २६ लसीकरण, १ लाख ४४ हजार ७२० रक्तचाचण्या तसेच ९ हजार २१८ इसीजी तपासणी करण्यात आली आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिराचे उत्साहात उद्घाटन

प्रतिनिधी । चोपडा

**महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन भाऊसो. शामराव शिवराम पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चहार्डी येथे दि. १८ ते २४ जानेवारी या दरम्यान करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरासाठी भैयासाहेब डॉ. संदीप पाटील अध्यक्ष, महात्मा गांधी शिक्षण मंडळ चोपडा व ताईसो स्मिता पाटील सचिव, महात्मा गांधी शिक्षण मंडळ चोपडा यांनी शुभेच्छा दिल्या.**



या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष म्हणून विद्याप्रसारक मंडळ, चहार्डीचे अध्यक्ष डॉ. सुरेश शामराव पाटील, उद्घाटक म्हणून चहार्डी येथील माजी सैनिक प्रवीण बन्सीलाल पाटील, चहार्डी विद्या प्रसारक मंडळ चहार्डीचे उपाध्यक्ष डॉ. पराग पाटील, चहार्डी विद्या प्रसारक मंडळ चहार्डीचे सचिव प्रकाश पाटील, महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे कार्यकारी मंडळ सदस्य गोविंदा महाजन चहार्डी विद्याप्रसारक मंडळाचे संचालक जी. टी. पाटील, चहार्डी विद्याप्रसारक मंडळाचे निलेश पाटील, चहार्डीचे उपसरपंच ज्ञानेश्वर पाटील , चहार्डीचे पोलीस पाटील जीवन महाजन, शारीरिक शिक्षण उ.मा.वि.चहार्डीचे प्राचार्य पंकज पाटील, जीवन महाजन, शा.शी उ.मा.वि. चहार्डीचे माजी प्राचार्य विजय सोनवणे, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.के.एन. सोनवणे, महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.एस.ए.वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी सुरुवातीला दीपप्रज्वलन करून राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय दादासाहेब डॉ.सुरेश जी पाटील व माजी शिक्षण मंत्री स्वर्गीय आक्कासाहेब शरदचंद्रिका सुरेश पाटील यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेमधील जागृती बारी, कांचन शंभरकर व प्रतीक्षा महाजन या स्वयंसेविकांनी स्वागतगीत सादर केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक विशाल पी. हौसे यांनी केले. येत्या सात दिवसांतील कार्यक्रमाच्या नियोजनाचा आराखडा त्यांनी आपल्या प्रास्ताविकेतून सादर केला.

डॉ. के.एन. सोनवणे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या. तसेच हिवाळी श्रमसंस्कार शिबिर हे विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी असून या संधीचे सोने करून स्वयंसेवकांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा. पर्यायी देशाचा विकास होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत डॉ. सुरेश शामराव पाटील यांनी व्यक्त केले.

**शिबिराच्या माध्यमातून समाज विकास व स्वविकास साधावा, असे त्यांनी स्वयंसेवकांना आवाहन केले. या उदघाटन कार्यक्रमाला भाऊसो शामराव शिवराम पाटील, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चहार्डी येथील प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी वृंद यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक कार्यक्रमाधिकारी एस. बी. पाटील यांनी तर आभार डॉ. के. डी. गायकवाड यांनी केले.**

# समाजकार्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप



प्रतिनिधी । चोपडा

**भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, विष्णापूर येथे करण्यात आले होते.**

या शिबिराच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी डॉ. ईश्वर सौदाणकर,(प्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय, चोपडा), प्रा. डॉ. आशिष गुजराथी, (उपप्राचार्य, समाजकार्य महाविद्यालय, चोपडा) प्रा. एस.टी. बारी,(प्राचार्य, ललित कला केंद्र चोपडा), धनराज मिस्त्री, किशोर सैंदाणे, (अधीक्षक, शासकीय आश्रमशाळा, विष्णापूर), केतकी गायकवाड,(अधीक्षिका, शासकीय आश्रमशाळा, विष्णापूर) प्रा. डॉ. संबोधी देशपांडे, (कार्यक्रम अधिकारी), प्रा. डॉ. उत्तम सोनकांबळे,(सहाय्यक कार्यक्रम अधिकारी) यांच्या उपस्थितत संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ,राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

सर्व विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत सादर केले. यानंतर राहुल पावरा, मोहिनी पाटील, दौलत राऊत, अश्विन पावरा, पंचशीला वाघ, पूजा साळुंखे, महेंद्र साळुंखे, नीता बारेला या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर प्राचार्य एस.टी. बारी सर, यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेमधील शिबिरामध्ये आपण खूप चांगले सामाजिक कार्यक्रम राबवले आहेत. आपण सर्वांनी केलेल्या श्रमदान आणि सामाजिक उपक्रमांमधून आपल्यामध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण झाल्याचे दिसून आले. आजच्या युवकांचा व्यक्तिमत्व विकास अशा शिबिरांमधूनच खऱ्या अर्थाने होतो. यानंतर प्राचार्य डॉ. ईश्वर सौदाणकर सर, यांनी विद्यार्थ्यांनी राबवलेल्या सर्व सामाजिक उपक्रमाबद्दल कौतुक केले. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीएसडब्ल्यू - प्रथम वर्षाची विद्यार्थिनी दिव्या कोळी हिने केले. कार्यक्रमाचे आभार बीएसडब्ल्यू द्वितीय - वर्षाची विद्यार्थिनी सायली माळी हिने मानले. सदर शिबिराच्या यशस्वितेसाठी समाजकार्य महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, आश्रम शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सर्व सहभागी विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

**● आजच्या युवकांनी खऱ्या अर्थाने जागृत होऊन, राष्ट्रहितासाठी सेवा करणे हे युवकांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरात ज्या गोष्टी आपल्याला शिकायला मिळाल्या आहेत, त्याचा फायदा पुढील आयुष्यात आपणास निश्चितपणे होईल. सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी भावी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## थोडक्यात

### धरणगाव प्रभाग क्रमांक ८ मध्ये गटारी सफाईचा प्रश्न लागला मार्गी

**धरणगाव ।** शहरातील विविध प्रश्नाकडे नवीन नगराध्यक्षा लिलाताई चौधरींसह सर्व नगरसेवक गांभीर्याने पहात आहेत. येथील प्रभाग क्रमांक ८ मध्ये अनेक दिवसांपासून गटारी तुंबणे, गटारी व पाण्याचा निचरा न होणे, यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. यागंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी परिसरातील नागरिकांनी नगरसेवक सुनील चौधरी यांना प्रत्यक्ष बोलावून सद्यस्थिती दाखवली. त्यांनी कोणताही विलंब न करता नगरपालिका सफाई कर्मचाऱ्यांना तात्काळ फोन करून सर्व गटारी व नाल्यांची साफसफाई करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यांच्या हस्तक्षेपामुळे काही वेळातच संबंधित ठिकाणी सफाईचे काम सुरू झाले आणि साचलेले पाणी व कचरा हटवण्यात आला.

### कवी अशोक सर्वटकर आज जळगाव आकाशवाणीवर

**भुसावळ ।** येथील कवी अशोक जयराम सर्वटकर यांच्या गायनाचे प्रसारण उद्या सोमवार, दि.१९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता जळगाव आकाशवाणी केंद्रावरून करण्यात येणार आहे. ते स्पंदन वृत्त आणि व्यक्तींच या विषयावर काव्य गायन करणार आहेत. या कार्यक्रमाचे सादरकर्ते विजय भुयार हे आहेत. या कार्यक्रमाचा काव्य प्रेमी तथा नागरिकांसह समस्त बांधवांनी आस्वाद घ्यावा.

### संदीप पाटील यांची महाराष्ट्र केसरीसाठी निवड

**अमळनेर ।** वार्ताहर तालुक्यातील टाकरखेडा येथील संदीप सुरेश पाटील यांची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी ७१ किलो वजनी गटात जिल्ह्यातून निवड झाली आहे. संदीपने आतापर्यंत अनेक मोठ्या स्पर्धा गाजवल्या आहेत. त्यात ऑल इंडिया युनिव्हर्सिटी तसेच राज्यस्तरीय स्पर्धेत सिल्वर मेडल मिळवले आहे. एवढेच नाही संदीपने बॉक्सिंगमध्येही आपले नाव कमावलेले आहे. ऑल इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून राज्यातूनही अनेक स्पर्धा गाजवल्या आहेत. अत्यंत गरीब परिस्थितीतून संदीपने यश मिळवले आहे.

# आदिवासी सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी फूड प्रोसेसिंग,शिलाई मशिन प्रशिक्षण



प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील वैजापूर येथे आदिवासी सुशिक्षित बेरोजगार युवकांना जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून फूड प्रोसेसिंग,शिलाई मशिनचे प्रशिक्षण देण्यात आले. विष्णापूर, वराड,कर्जाणे, खाऱ्यापाडाव, मेलाणे, जिरायत पाडा आडगाव, चौगाव, भारडू, तावसे वडती, विरवाडे, संपुले, अडावद, अंबाडे आदी गावातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी लाभ घेतला.**

मुख्यमंत्री उद्योग बँक कर्ज योजना अंतर्गत हे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. या शिबिरात उद्योग सुरू करण्यासाठी बँक कर्ज योजना, शासन अनुदान, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, व्यवसाय निवड, प्रशिक्षण व बँक समन्वय याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

➤ शिबिरामुळे सहभागी युवक-युवतींना स्वावलंबनाची दिशा मिळाली असून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आत्मविश्वास निर्माण झाला. श्री लासुरकर सर उद्योग निरीक्षक विजय सैदाने, कार्यक्रम आयोजक जिल्हा उदयोग केंद्र जळगाव, श्रीमती प्रणिता पावरा सेंटर मॅनेजर वित्तीय साक्षरता केंद्र चोपडा, सुनील भील सेंटर मॅनेजर ,वित्तिय साक्षरता केंद्र अमळनेर तसेच कर्जाणेचे उपसरपंच प्रमोद बारेला,जगदीश भिल( विष्णापूर सरपंच), नामा पावरा, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते राकेश बारेला आदी उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त हरिनाम कीर्तन सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी । चाळीसगाव

जगतगुरु संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी शहरातील हनुमानवाडीतील विठ्ठल मंदिर परिसराजवळ महादेव मंदिर येथे अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. खान्देश कुणबी मराठा समाज बांधवांच्यावतीने हे आयोजन करण्यात आले असून आयोजनाचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे. या कीर्तनाला शुक्रवार दि.१६ जानेवारीपासून सुरूवात होत आहे. २३ जानेवारीला या सप्ताहाचे काल्याच्या कीर्तनाने समारोप होणार आहे.

# राजनंदिनी पाटील यांची सीआयएसएफच्या कॉन्स्टेबलपदी निवड

प्रतिनिधी । पारोळा

**तालुक्यातील मंगरूळ येथील दिपचंद कौनिक पाटील यांची नातसून व प्रल्हाद दीपचंद पाटील मंगरूळ (ता. पारोळा) यांची ज्येष्ठ सुनबाई राजनंदिनी चंद्रकांत पाटील (वय २५) यांच केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात (सीआयएसएफ) कॉन्स्टेबलपदी निवड झाली. त्यांनी माहेरच्या (मठगव्हाण ता. अमळनेर) व सासरच्या परिवाराचे नाव रोशन केले आहे.**

दोघे गावातील पहिली महिला देशसेवेसाठी भरली गेली ही गावासाठी खुप अभिमानास्पद व आनंदाची बाब आहे. त्या त्यांच्या यशाच रहस्य सांगतांत की, त्याची देशसेवेची जिद्द व सासरच्या परिवारांचा पाठिंबा मिळाला म्हणून मी पुढे पाहुल टाकु शकल्याचे राजनंदिनी पाटील यांनी सांगितले. त्यांच्या या यशाबद्दल मंगरूळ सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, सदस्य व ग्रामस्थ तसेच मठगव्हाण तालुका अमळनेर येथील माता-पिता तसेच सरपंच उपसरपंच पोलीस पाटील ग्रामस्थांनी अभिनंदन करून कौतुक केले.

# पारोळा येथे ग्रंथालयाच्या वार्षिक अधिवेशनानिमित्त ग्रंथदिंडी

प्रतिनिधी । पारोळा

**नाशिक विभाग व जळगांव जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पारोळा येथे आयोजित वार्षिक अधिवेशनात ग्रंथ दिंडी, प्रतिमा पूजन व उदघाट्न करतांना लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत बी पाटील यांनी काही शब्दात असे सुचवले की ग्रंथ हा मानव जीवनात खूप आधुनिक क्रांती आणू शकतो.**




वाचनानेच माणूस मोठा होतो वाचनाशिवाय पर्याय नाही ग्रंथालयासाठी काही मदत लागेल तर आम्ही कधीही मदत करू असे थोडक्यात सांगितले कार्यक्रमाला उपस्थित लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील तसेच संचालक अशोक गाडेकर, उपसंचालक सचिन जोपूळे, डॉ. शांताराम पाटील, समिरे पाटील, कोषाध्यक्ष सतिष पाटील, ग्रंथालय सेलचे पदाधिकारी, प्रेमी, कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

# भुसावळ नगरपरिषद स्थलांतराला भाजपाचा विरोध

## गटनेते युवराज लोणारी यांची पत्रकार परिषद : जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देणार

प्रतिनिधी । भुसावळ

**येथील नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित सत्ताधारी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी नगरपरिषदेचे विद्यमान दप्तर व प्रशासकीय कारभार संत गाडगेबाबा रुग्णालयात स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू केल्याने शहरात राजकीय वादळ उठले आहे. या निर्णयाविरोधात भारतीय जनता पक्षाचे गटनेते युवराज लोणारी यांनी पत्रकार परिषद घेऊन तीव्र विरोध नोंदवला.**




नगरपरिषदेच्या स्थलांतरासाठी कोणताही अधिकृत ठराव, निविदा प्रक्रिया अथवा आवश्यक परवानग्या घेतल्या नसल्याचा आरोप लोणारी यांनी केला. या स्थलांतरामुळे शहरातील गोरगरीब जनतेच्या आरोग्य सेवांवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नवनिर्वाचित नगरसेवक संतोष चौधरी यांनी विद्यमान नगरपरिषद इमारतीला कोंडवाडा असे संबोधले होते. याच पार्श्वभूमीवर लोणारी यांनी सत्ताधाऱ्यांना प्रतिप्रश्न उपस्थित करत म्हटले, जर ही इमारत कोंडवाडा असेल, तर सत्ताधारी त्याच ठिकाणी गोरगरीब रुग्णांना उपचारासाठी दाखल करणार आहेत का? नगरपरिषदेचे दप्तर रुग्णालयात हलवण्याच्या नावाखाली जनतेच्या आरोग्य सेवेशी खेळ केला जात आहे. हा प्रकार म्हणजे निव्वळ मनमानी असून त्या विरोधात भाजपा निश्चितपणे या प्रकाराला विरोध करेल व सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करणार असल्याचे सांगितले. यावेळी संत गाडगेबाबा रुग्णालयात सध्या भूलतज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने महिलांच्या प्रसूतीसारख्या अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देता येत नसल याकडेही लोणारी यांनी लक्ष वेधले. शहरातील गोरगरीब जनतेच्या आरोग्य सेवेसाठी काही वर्षांपूर्वी गरूड परिवाराने नगरपालिका दवाखान्यासाठी जागा दान केली होती, याची आठवण करून देत त्यांनी नगराध्यक्ष व सत्ताधाऱ्यांची जबाबदारी अधोरेखित केली. भूलतज्ज्ञ व आवश्यक वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करून देणे ही सत्ताधाऱ्यांची प्राथमिक जबाबदारी आहे.

मात्र त्याऐवजी दप्तर स्थलांतराचा दिखाऊ प्रकार सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला. लोणारी यांनी सकारात्मक प्रस्ताव मांडत सांगितले की, नगरपरिषदेच्या नवीन इमारत बांधकामासाठी २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. नवीन नगरपरिषद इमारत उभारण्यासाठी वखोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या माध्यमातून आमचा कायम पाठिंबा राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सध्याची स्थलांतर प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अन्यथा जिल्हाधिकारी जळगाव यांच्याकडे निवेदन देण्यात येईल, असा इशारा लोणारी यांनी दिला. दप्तर थेट उचलून हलविल्यास कागदपत्रे गहाळ होण्याचा धोका आहे. ही अनधिकृत कृती कायद्याच्या कक्षेत येऊ शकते, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणावर उपनगराध्यक्ष शैलजा नारखेडे यांनीही नगरपरिषद स्थलांतराचा निर्णय चुकीचा असून दवाखाना हलवण्यात आल्यास नागरिकांची व रुग्णांची मोठी गैरसोय होईल असे सांगितले. तर नगरसेवक पिंटू कोठारी यांनी, भुसावळ नगरपालिका दवाखान्याला गरुड परिवाराने १ जानेवारी १९२७ मध्ये साधारण एक एकर जागा गरीबांवर गावातच उपचार व्हावे या उद्देशाने दान करण्यात आली तसेच अनेक दात्यांनी त्यासाठीच सढळ हाताने मदत केली.

मात्र बेकायदेशीरपणे पालिका रुग्णालयांत स्थलांतरीत केली जात आहे. या दवाखान्याला आता शंभर वर्ष पूर्ण होत आहेत, परंतु सुसज्ज दवाखाने बांधणे अपेक्षित असताना पालिका दवाखान्यात आणण्याचा प्रकार वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेमुळे भुसावळ नगरपरिषदेत राजकीय वातावरण तापले असून चांगल्या कामासाठी आम्ही सहकार्य करू मात्र चुकीच्या कार्याला विरोध करणार असे यावेळी नगरसेवकांनी सांगितले.

**➤ वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आपण द देश आपल्या भाजपा गटनेते युवराज लोणारी यांच्यासह उपनगराध्यक्षा शैलेजा नारखेडे, जिल्हा सरचिटणीस व उपगटनेते परीक्षीत बऱ्हाटे, नगरसेवक निर्मल कोठारी, गिरीश महाजन, राजेंद्र आवटे, नितीन धांडे, प्रकाश बत्रा, विशाल नाटकर, आशिष पटेल, पुरुषोत्तम नारखेडे, गुणवंत बोरोले, कैलास चौधरी, उदय पाटील, अल्बर्ट तायडे, सुजित भोळे, किरण कोलते व देवा वाणी आदी उपस्थित होते. या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका काय असते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**